**वॉक इन इंटरव्हयू**

**महाराष्ट्र शासन**

**विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण, नवी मुंबई (कोंकण).**

महाराष्ट्र शासन निर्णय, गृह विभाग क्र. एमआयएस—३६१४/प्रक्र.१३/पोल—३,दिनांक १०/०९/२०१४ अन्वये प्राधिकरणाचे कार्यालयासाठी गुन्हे अन्वेषण कामाचा अनुभव असलेले सेवानिवृत्त राजपत्रित पोलीस अधिकारी तथा तपास अधिकारी यांची पदे मंजूर करण्यात आलेली आहेत.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण—२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७/१२/२०१६ मधील तरतूदीनुसार खालील नमूद मंजूर पदे ही कार्यालयाचे विवक्षित कामकाज करणेसाठी एक वर्षाचे कालावधीकरीता करार पध्दतीनुसार भरावयाची आहेत. या पदांसाठी केवळ गुन्हे अन्वेषणाच्या कामाचा तपास अधिकारी म्हणून किमान ०३ वर्षांचा अनुभव असलेले सेवानिवृत्त राजपत्रित पोलीस अधिकारी पात्र आहेत त्यांचे मासिक परिश्रमिक म.रा.शासन गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक एम.आय.एस.—३६१४/प्र.क्र.१३/पोल—३, दिनांक १०/०९/२०१४ मध्ये नमूद असल्याप्रमाणे अंतिम वेतन वजा पेन्शन या सुत्रानुसार असेल.

| अ. क्र. | पदनाम | पदसंख्या | मुलाखतीचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | गुन्हे अन्वेषण कामाचा अनुभव असलेले सेवानिवृत्त राजपत्रित पोलीस अधिकारी तथा तपास अधिकारी | ०६ | **२८/११/२०२३** |

**सर्व पदांसाठी सूचना**

१) करार पध्दतीने नियुक्ती करण्यात येणा—या सेवानिवृत्त अधिकारी यांना महाराष्ट्र शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण—२७१५/प्रक्र. १००/१३, दिनांक १७/१२/२०१६ मधील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील. सबब त्यांनी नमूद शासन निर्णयाचे सूक्ष्म अवलोकन करावे.

२) करार पध्दतीने नियुक्ती करण्यात येणा—या सेवानिवृत्त अधिकारी यांनी करावयाच्या अर्जाचा नमुना, प्रतिज्ञापत्र, अनुभव, वयोमर्यादा, मासिक पारिश्रमिक, भत्ते, कर्तव्य व जबाबदा—या, अटी व शर्ती पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांच्या www.navimumbaipolice.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले आहेत.

**मुलाखतीच्या दिवशी दिनांक २८/११/२०२३ रोजी सकाळी ११:०० वा** इच्छुक उमेदवारांनी मूळ कागदपत्रांसह वॉक—इन—इंटरव्हयुसाठी पोलीस आयुक्त, नवी मुंबई या कार्यालयातील मिटींग हॉल, पहिला मजला, भारतीय रिझर्व बॅकेसमोर, सेक्टर—१०, सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ येथे स्वखर्चाने उपस्थित रहावे.

स्वाक्षरित

पोलीस आयुक्त, नवी मुंबई
तथा विभाग प्रमुख,
विभागीय पोलीस तक्रार
प्राधिकरण, नवी मुंबई
(कोंकण) यांचे मान्यतेने.

सही/—
(संजयकुमार पाटील)
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय, नवी मुंबई
तथा सदस्य, कार्यालय प्रमुख, आहरण व संवितरण अधिकारी, विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण, नवी मुंबई (कोंकण)

विभागीय पोलीस तक्रार प्राधीकरण, नवी मुंबई (कोंकण विभाग) या कार्यालयात प्राधिकरणाच्या कामकाजानुसार गुन्हे अन्वेषणाच्या कामाचा अनुभव असलेले सेवानिवृत्त राजपत्रित पोलीस अधिकारी तथा तपास अधिकारी म्हणुन काम करण्याकरिता सेवा करार पद्धतीने घेणेसाठी विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

खालील माहिती सोबत जोडली आहे :–

१) अर्जाचा नमूना

२) अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र

३) (अ) अनुभव व वयोमर्यादा,

(ब) मासिक पारिश्रमिक व भत्ते,

(क) कर्तव्य व जबाबदाऱ्या,

(ड) अटी व शर्ती

(इ) आवेदनासोबत जोडावयाचे अभिलेख

४) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण – २७१५/प्रक्र १००/१३, दिनांक – १७/१२/२०१६ ची प्रत.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण – २७१५/प्र.क्र.१००/१३, दि. १७ डिसेंबर,२०१६ मधील तरतुदीनुसार तयार करण्यात येणा–या नामिकासुचीची (Panel) वैधता – सदर नामिकासूचीतील व्यक्तिंमधूनच करार पद्धतीने नियुक्ती करण्यात येईल. सदर नामिकासूचीची वैधता कमाल ३ वर्षे राहील तसेच त्या सूचीचा वार्षिक आढावा घेण्यात येईल.

अर्जाचा नमूना

| कार्यालयीन उपयोगासाठी<br><br>१) अर्ज क्रमांक: [ ][ ][ ][ ][ ][ ][ ]<br><br>२) अर्ज स्विकारल्याचा दिनांक: [ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ]<br><br>३) अर्ज स्विकारणा—याची स्वाक्षरी (दिनांकासह)...................................... | पासपोर्ट साईज फोटो |
|---|---|

————————————————————————————————————————————

सूचना :— अर्जातील अंक फक्त इंग्रजीत लिहावेत.

<u>अर्जदाराची वैयक्तिक महिती:—</u>

१. अर्जदाराचे संपुर्ण नाव: आडनांव नांव वडिलांचे/पतीचे नांव

मराठीत:.......................................................................................................................................

इंग्रजीत: [ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ]

२. पत्रव्यव्यहाराचा पत्ता:.......................................................................................................

तालुका:..................................जिल्हा:.........................................................पिन [ ][ ][ ][ ][ ][ ]

३. कायमचा पत्ता:...................................................................................................................

तालुका:....................................जिल्हा:...................................................... पिन [ ][ ][ ][ ][ ][ ]

४. दूरध्वनी क्रमांक: लॅडाइन........................................मोबाईल क्रमांक:..................................................

५. ई—मेल:.........................................................................................................

६.जन्मदिनांक :— [ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ] (प्रमाणपत्र सोबत जोडावे )

७.लिंग: पुरूष [ ] /महिला [ ]

८.शैक्षणिक अर्हता:

| शिक्षण | शैक्षणिक संस्थेचे नाव (विद्यालय /महाविद्यालय) | बोर्ड/विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचा दिनांक | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी | प्रमाणपत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | | | | | | प्रमाणपत्र सोबत जोडावे |

९. गुन्हे अन्वेषणाच्या कामाचा अनुभव असलेले सेवानिवृत्त राजपत्रित पोलीस अधिकारी तथा तपास अधिकारी, या पदासाठी

तपशील:–

संपूर्ण सेवा तपशील (पृष्ठयर्थ कागदपत्रे जोडावीत.)

| अ.क्र. | पद | नेमणूक | कालावधी |
|---|---|---|---|
| १) | | | |

१०. इतर शैक्षणिक अर्हता:

संगणक प्रशिक्षित आहे काय ?: होय ☐ नाही ☐

११. अर्जदार म्हणजे करार पध्दतीने नियुक्त करावयाचे सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरूध्द कोणताही विभागीय चौकशीची

कार्यवाही चालू किंवा प्रस्तावित आहे अथवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली आहे काय ?

होय ☐ नाही ☐

१२. सध्या मिळत असलेले एकूण सेवानिवृत्ती वेतन :– निवृत्ती वेतन आदेशाची प्रत जोडावी.

अर्जदाराची सही

# अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र

मी. श्री. / सौ./ कु ........................................................................................

याद्वारे प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो / करते की, माझे आवेदन अर्जात मी दिलेली माहिती जाणीवपूर्वक तसेच, विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमुद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर अथवा नियुक्ती झाल्यानंतर माझी निवड / नियुक्ती रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमूद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळल्यास त्याची पूर्णपणे जबाबदारी माझ्यावर राहील व कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन. तसेच, मी निवड प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेन. मला असेही ज्ञात आहे की, ही नेमणूक फक्त/निव्वळ करार पध्दतीवर आहे व याबाबत माझा कोणताही नोकरी विषयक दावा राहणार नाही. याबाबत उदभवणार कोणतेही वादावर मी कोणत्याही कोर्टात दाद मागू शकणार नाही व पोलीस आयुक्त, नवी मुंबई तथा विभाग प्रमुख, विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण, नवी मुंबई (कोंकण विभाग) यांचा निर्णय अंतिम राहील.

ठिकाण :

दिनांक: अर्जदाराची सही

**( अ ) अर्हता, अनुभव व वयोमर्यादा :—**

**१) अर्हता व अनुभव :—**

अ) गुन्हे अन्वेषणाच्या कामाचा तपास अधिकारी म्हणुन काम केल्याचा किमान ०३ वर्षांचा अनुभव असलेले सेवानिवृत्त राजपत्रित पोलीस अधिकारी

ब) करार पध्दतीने नियुक्त करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी शारीरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाटी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

क) करार पध्दतीने नियुक्त करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरूध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

**२) वयोमर्यादा :—** करार पध्दतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या व्यक्ती वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील.

**(ब) मासिक पारिश्रमिक व भत्ते :—**

गुन्हे अन्वेषणाच्या कामाचा अनुभव असलेले सेवानिवृत्त राजपत्रित पोलीस अधिकारी तथा तपास अधिकारी यांचे मसिक पारिश्रमिक गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक: एमआयएस — ३६१४/प्र.क्र.१३/पोल—३ दि. १० सप्टेंबर, २०१४ मधील पदासमोर दर्शविलेल्या अंतिम वेतन वजा पेंशन या सुत्राप्रमाणे असेल.

**( क ) कर्तव्य व जबाबदाऱ्या :—**

गुन्हे अन्वेषणाच्या कामाचा अनुभव असलेले सेवानिवृत्त राजपत्रित पोलीस अधिकारी तथा तपास अधिकारी :— महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार — ब/ऑगस्ट १०, २०१८/श्रावण १९, १९४० प्रमाणे अधिसूचीत Maharashtra Divisional Level Police Complaint Authority (Administration and Procedure) Regulation, 2018 प्रमाणे विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण, नवी मुंबई (कोंकण), पहिला मजला, एम.टी.एन.एल., टेलिफोन एक्सचेंज, प्लॉट नं.७ब, सेक्टर—२१, खारघर, नवी मुंबई स्थित कार्यालय येथे व प्राधिकरणाशी संबंधित विवक्षित कामे करण्याचे कर्तव्य व जबाबदाऱ्या राहतील.

**( ड ) अटी व शर्ती :—**

१) सदर कामासाठी करार पद्धतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त एका वर्षासाठी देण्यात येईल, परंतु अशा नियुक्तीचे आवश्यकतेनुसार वाढीव कालावधीकरिता दरवर्षी नूतनीकरण करण्यात येईल मात्र, एकुण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

२) करार पद्धतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरूद्ध कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

३) करार पद्धतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

४) करार पद्धतीने नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांनी करार पद्धतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार असतील.

५) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी.

६) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध ( conflict of interest ) जाहीर करणे आवश्यक राहील.

७) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

८) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेली कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेवून कामाचे मूलयमापन करतील.

९) करार पध्दीतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत.

**(इ) आवेदनासोबत जोडावयाचे अभिलेख :—**

१) निवृत्ती वेतनाच्या आदेशाची सत्यप्रत,
२) अलीकडचा रंगीत पासपोर्ट साईज फोटो (चार प्रती),
३) सेवानिवृत्तीपूर्व लगतचे मागील ५ वर्षांचे गोपनीय अहवालाच्या सत्यप्रती,
४) सेवानिवृत्तीनंतर सेवा करारावर काम केले असल्यास त्याबाबतची कागदपत्रे व अनुभव प्रमाणपत्र,
५) सेवा पुस्तकाच्या पहिल्या पानाची साक्षांकित फोटो प्रत,
६) सेवेत असताना विभागीय चौकशी सुरू अथवा प्रस्तावित नाही तसेच अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नाही याबाबतचे स्वयंघोषणापत्र,
७) नियुक्तीनंतर सेवा करण्यास शारीरिक दृष्टया पात्र असल्याचे स्थानिक डॉक्टरांचे वैद्यकीय प्रमाणपत्र,
८) कोणताही फौजदारी गुन्हा दाखल अथवा प्रलंबीत नसल्याबाबत स्वयंघोषणापत्र.

## महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण – २७१५/प्रक्र १००/१३, दिनांक – १७/१२/२०१६ ची प्रत.

**शासकीय/ निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणे ....**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १७ डिसेंबर, २०१६

**वाचा** : शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३
दि. ८ जानेवारी, २०१६ व दि. २ मार्च, २०१६

**प्रस्तावना :-**

सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवा विषयनिहाय एमपॅनलमेंट (Empanelment) करुन करार पद्धतीने घेण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला असून त्याबाबतचा शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि. ८.१.२०१६ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. दि.२ मार्च २०१६ च्या शासन निर्णयानुसार पॅनलला (सूचीला) मान्यता देणे आणि नियुक्ती करणेबाबतचे अधिकार विभागप्रमुखांना प्रदान करण्याचे अधिकार प्रशासकीय विभागांस देण्यात आलेले आहेत.

उक्त शासन निर्णयातील तरतुदींनुसार कंत्राटी तत्वावर नेमण्यात येणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्या मासिक पारिश्रमिकाची परिगणना करताना अडचणी उद्भवत असल्याने त्यामध्ये योग्य ती सुधारणा करणे; त्याचप्रमाणे काही मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे यांना उक्त शासन निर्णयातील तरतूदी शिथिल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

**शासन निर्णय –**

१. दि.८.१.२०१६ व दि. २.३.२०१६ हे दोन्ही शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत असून खालीलप्रमाणे सर्वसमावेशक निर्णय घेण्यात येत आहे.

२. प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधिनस्त कार्यालयातील विविध विषयांसंदर्भात **"विवक्षित सेवा/कामांसाठी" विषयनिहाय एमपॅनलमेंट (Empanelment) करुन सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पद्धतीने उपलब्ध करुन घेता येतील. उदा.** आस्थापनाविषयक बाबी/ सेवाप्रवेश नियम, पायाभूत सुविधा निर्मिती, नागरी सेवा पुरविणे, विशेष गुप्त वार्ता, योजनांचे मूल्यमापन इत्यादी. *आवश्यकतेप्रमाणे इतर विवक्षित सेवा/कामांचा यामध्ये समावेश करता येईल.* त्याकरिता पुढीलप्रमाणे कार्यपद्धती विहीत करण्यात येत आहे -

**अ) निवडप्रक्रिया व नियुक्ती –**

**१) नामिकासूची (Panel)** - करार पध्दतीने "विवक्षित कामांसाठी" नेमणूका करताना पारदर्शक पध्दतीचा अवलंब करण्यात यावा. विहीत पद्धतीने जाहिरात देऊन "विवक्षित कामांसाठी" पात्र सेवानिवृत्त अधिकाऱ्यांकडून अर्ज मागविण्यात यावेत. जाहीरातीमध्ये नामिकासूचीत नियुक्त करावयाच्या एकूण व्यक्तिंची संख्या, विवक्षित कामाचे स्वरुप, कालावधी आणि देय मासिक पारिश्रमिक ( शासन निर्णयातील ड (१) (क) च्या अनुषंगाने)

यांचा उल्लेख करण्यात यावा आणि प्राप्त अर्जातून पात्र उमेदवाराची निवड करुन नामिकासूची (Panel) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांनी तयार करावी.

२) **नामिकासूचीची (Panel) वैधता** - सदर नामिकासूचीतील व्यक्तिमधूनच करार पध्दतीने नियुक्ती करण्यात यावी. सदर नामिकासूचीची वैधता जास्तीत जास्त ३ वर्षे राहील तसेच त्या सूचीचा वार्षिक आढावा घेण्यात यावा.

३) **एमपॅनलमेंटचा कालावधी** - विवक्षित कामाचे स्वरुप आणि व्याप्ती विचारात घेऊन ते काम पूर्ण करण्याचा कालावधी सक्षम प्राधिकारी यांनी निश्चित करावा.

४) **बंधपत्र/हमीपत्र** - नियुक्तीच्या कालावधीत करार पद्धतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील या आशयाचे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्यांकडून घेण्यात यावे. तसेच सदर बंधपत्रात/हमीपत्रात, करार पद्धतीने नियुक्ती देताना शासनाने या निर्णयान्वये विहित केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरीक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा, तसेच करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही, याचा उल्लेख करण्यात यावा.

५) **नियुक्ती आदेश** - नामिकासूचीतील व्यक्तीकडून बंधपत्र प्राप्त झाल्यानंतर करार पद्धतीने नियुक्ती देण्याबाबतच्या आदेशांमध्ये "एमपॅनलमेंटचा विषय", "विवक्षित स्वरुपाचे काम" आणि ते काम पूर्ण करण्यासाठी अपेक्षित असलेल्या कालावधीचा स्पष्टपणे उल्लेख करुन सक्षम प्राधिकारी यांनी नियुक्ती आदेश काढावेत.

६) **करार पद्धतीने नियुक्ती द्यावयाच्या व्यक्तिंची संख्या** - करार पध्दतीने नियुक्ती देताना कार्यालयातील/आस्थापनेवरील एकूण मंजूर पदसंख्येच्या जास्तीत जास्त १० % इतके अधिकाऱ्यांना करार पद्धतीने नियुक्ती देता येईल. करार पद्धतीने नियुक्त्या करण्याचे प्रस्ताव तयार करताना कामाचे स्वरुप, आकस्मिकता, सार्वजनिक हित इ. बाबी विचारात घेण्यात याव्यात.

७) **करार पद्धतीने नियुक्तीची कालमर्यादा** - सदर कामासाठी करार पद्धतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त एका वर्षासाठी देण्यात यावी. परंतु अशा नियुक्तीचे आवश्यकतेनुसार वाढीव कालावधीकरीता दरवर्षी नूतनीकरण करता येईल. मात्र, एकूण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

८) **वयोमर्यादा** - करार पद्धतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील. तथापि, ज्या व्यक्तिंच्या सेवा त्यानंतर चालू ठेवणे आवश्यक आहे, असे मत असेल त्यांच्या सेवा सक्षम प्राधिकाऱ्यास एकस्तर वरीष्ठ अधिकाऱ्याच्या/प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने पुढे चालू ठेवता येतील मात्र, कोणत्याही परिस्थितीत करार पद्धतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या ७० व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील.

९) **सक्षम प्राधिकारी -**

(१) गट-अ (ग्रेड पे रु. ७६००/- किंवा अधिक) संवर्गीय सेवेमधून सेवानिवृत्त अधिकारी यांना करार पद्धतीने नियुक्ती देण्याचे अधिकार शासनास असतील.

(२) गट-अ ( ग्रेड पे रु. ७६००/- पेक्षा कमी) संवर्गीय सेवेमधून सेवानिवृत्त अधिकारी यांना करार पद्धतीने नियुक्ती देण्याचे अधिकार महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील नियम ९(२२) नुसार घोषित करण्यात आलेल्या विभाग प्रमुखांना (Head of the Department) असतील.

(३) गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) या संवर्गीय सेवेमधून सेवानिवृत्त अधिकारी यांना करार पद्धतीने नियुक्ती देण्याचे अधिकार प्रादेशिक प्रमुखांना (Regional Heads) असतील.

(४) गट-क व गट-ड संवर्गातून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना करार पद्धतीने नियुक्ती देण्यात येऊ नये.

**ब) अर्हता व अनुभव -**

१) विवक्षित कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा संबंधित कामाचा किमान तीन वर्षांचा अनुभव ही पूर्वअट ठेवण्यात यावी.

२) करार पद्धतीने नियुक्त करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

३) करार पद्धतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुद्ध कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

**क) नियमित मंजूर पदे**

१) सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची करार (Contractual) पद्धतीने करण्यात येणारी नियुक्ती ही **नियमित** स्वरुपाच्या कामकाजासाठी न करता केवळ **विवक्षित** कामासाठीच करण्यात यावी.

२) नियमित मंजूर पदांवर (Sanctioned Posts) करार पद्धतीने नियुक्ती करता येणार नाही, अशी पदे सेवाप्रवेश नियमानुसार विहीत केलेल्या मार्गाने नियमितपणे भरण्यात यावीत.

३) करार पद्धतीने नियुक्तीमुळे शासन सेवेत असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या पदोन्नतीच्या संधीवर प्रतिकूल परिणाम होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

**ड) मासिक पारिश्रमिक व भत्ते -**

१) **मासिक पारिश्रमिक** -

**(क) शासकीय / निमशासकीय सेवा** - सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची विहीत कार्यपद्धतीचे पालन करुन करार पद्धतीने नेमणूक करतांना त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात यावे आणि एकदा निश्चित करण्यात आलेले पारिश्रमिक त्यांच्या करार पद्धतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी (जास्तीत जास्त ३ वर्षे) कायम राहील.

*(तथापि, वेतनासाठी शासनाकडून अनुदान मिळत नसलेल्या शासकीय उपक्रम, महामंडळे, मंडळे, सांविधिक संस्था यांच्याबाबतीत वरीलप्रमाणे निश्चित*

*होणाऱ्या मासिक पारिश्रमिकाची रक्कम वाढविण्याचे अधिकार संबंधित शासकीय उपक्रम/ महामंडळे/ मंडळे यांच्या संचालक मंडळास आणि सांविधिक संस्थेच्या प्रमुखास/अध्यक्षास राहतील.)*

**(ब) निवृत्तीवेतनार्ह नसलेल्या निमशासकीय सेवा –** ज्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा निवृत्तीवेतनार्ह नाहीत त्यांना करार पद्धतीने नियुक्त करताना, सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेल्या वेतनाच्या आधारे त्यांची मानीव निवृत्तीवेतनाची रक्कम आणि त्यावर प्रचलित दराने महागाई भत्त्याची रक्कम केवळ हिशेबासाठी परिगणित करुन त्या आधारे त्यांचे मासिक पारिश्रमिक निश्चित करण्यात यावे.

२) **भत्ते** - उक्त तरतुदीनुसार निश्चित होणाऱ्या मासिक पारिश्रमिकाच्या "जास्तीत जास्त २५ %" इतक्या मर्यादेपर्यंत एकमुस्त रक्कम "निवास भत्ता, प्रवास भत्ता आणि दूरध्वनी भत्ता" या सर्व भत्त्यांपोटी प्रतिमाह अनुज्ञेय असेल. सदर रक्कम नियुक्त करावयाच्या अधिकारी/कर्मचारी यांची कार्यक्षमता, कार्यकुशलता, त्यांना पुरविण्यात आलेल्या सोयीसुविधा इ. बाबी विचारात घेऊन निश्चित करण्यात यावी.

*(मासिक पारिश्रमिक व भत्त्यांची परिगणना करण्याबाबतचे मार्गदर्शनपर उदाहरण या शासन निर्णया सोबतच्या "परिशिष्ट-अ" येथे उद्धृत करण्यात आली आहेत.)*

३) **प्रवासभत्ता व दैनिक भत्ता** - करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीवेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

४) करार पद्धतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे अशा व्यक्तींना अनुज्ञेय होणाऱ्या पारिश्रमिकाचा कोणताही परिणाम त्यांना प्राप्त होणाऱ्या निवृत्तीवेतन व महागाई भत्ता यावर होणार नाही.

५) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तिच्या पारिश्रमिकापोटी व भत्त्यांपोटी होणारा खर्च संबंधित कार्यालयाच्या "कार्यालयीन खर्च" या शिर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

**इ) इतर अटी व शर्ती –**

१) करार पद्धतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे /सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/ हक्क नसेल.

२) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पद्धतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

३) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावी.

४) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (conflict of interest) जाहीर करणे आवश्यक राहील.

५) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

६) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील.

३. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत.

४. करार पध्दतीने नियुक्ती करताना सामान्य प्रशासन विभाग आणि वित्त विभागाच्या सहमतीची आवश्यकता असणार नाही.

५. नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त / स्वेच्छा सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी / कर्मचारी यांना कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ, पुनर्नियुक्ती देण्यात येऊ नये.

६. हा शासन निर्णय सर्व शासकीय कार्यालये, शासकीय उपक्रम, संविधिक संस्था, मंडळे/महामंडळे आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांना लागू राहील.

७. शासन निर्णय दि. ०८.०१.२०१६ व दि. ०२.०३.२०१६ मधील तरतुदीनुसार करार पध्दतीने करण्यात आलेल्या नियुक्त्यांना देखील **या शासन निर्णयातील तरतुदी सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू होतील.**

८. हा शासन निर्णय वित्त विभागाने अनौपचारीक संदर्भ क्रमांक : अनौ. सं. क्र. ७७१/ १६/व्यय-४ दिनांक ३.१२.२०१६ नुसार दिलेल्या सहमतीन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१६१२१७१७१८२४१३०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Mukesh Khullar

**(मुकेश खुल्लर)**
**प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग**

**प्रति,**

१) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई. (५ प्रती)
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव. (५ प्रती)
३) सर्व.मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४) मा.विरोधी पक्ष नेता, विधान परिषद/विधान सभा यांचे सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५) सर्व विधान सभा/विधान परिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ
६) मा.अध्यक्ष,महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव
७) मा.सभापती,महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.
८) मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
९) सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.

१०) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ,विधान भवन,मुंबई.
११) *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१२) *प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
१३) *प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई /नागपूर/औरंगाबाद खंडपीठ
१४) *प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१५) *राज्य निवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
१६) *सचिव, राज्य माहिती आयोग,मुंबई.
१७) *महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखापरीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
१८) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई
१९) विभागीय आयुक्त (सर्व)
२०) जिल्हाधिकारी (सर्व जिल्हे)
२१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा (सर्व)
२२) सर्व मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभागप्रमुख/ प्रादेशिक विभाग प्रमुख
२३) सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना)
२४) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
२५) निवडनस्ती, कार्यासन-१३, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२
*पत्राने

**शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दि. १७ डिसेंबर, २०१६ सोबतचे**

**परिशिष्ट-अ**

**मासिक पारिश्रमिकाची व भत्यांची परिगणना करण्याबाबतचे उदाहरण**

| **मुद्दा** | **उदा. क्र. १** |
|---|---|
| निवृत्तीचा दिनांक | दि.३०.११.२०१३ |
| निश्चित झालेले मूळ निवृत्तीवेतन | रु.२५,३०० |
| अंशराशीकृत मुल्य | रु. १०,१२० |
| करार पद्धतीने नियुक्तीचा दिनांक | दि.१५.९.२०१६ |
| नियुक्तीच्या वेळी देय असलेल्या निवृत्तीवेतनाची रक्कम | रु.१५,१८० |
| नियुक्तीच्या वेळी प्राप्त होणाऱ्या निवृत्तीवेतनाची रक्कम + महागाई भत्ता | रु.१५,१८० + रु. ३१,६२५ (माहे नोव्हेंबर, २०१६ @ १२५%)<br>एकूण रु. ४६,८०५ |
| मासिक पारिश्रमिकाची रक्कम (शासकीय सेवा व निमशासकीय सेवा) | रु. ४६,८०० #<br>{शंभरात रुपांतरीत} |
| निवास भत्ता, प्रवास भत्ता आणि दूरध्वनी भत्ता" या सर्व भत्त्यांपोटी प्रतिमाह कमाल अनुज्ञेय रक्कम (मासिक पारिश्रमिकाच्या २५ %) | रु. ११,७०० *<br>*जास्तीत जास्त* |
| एकूण | रु. ५८,५०० *<br>*जास्तीत जास्त* |

# तथापि, वेतनासाठी शासनाकडून अनुदान मिळत नसलेल्या शासकीय उपक्रम/ महामंडळे/ मंडळे/सांविधिक संस्था यांच्याबाबतीत सदर पारिश्रमिकाची रक्कम वाढविण्याचे अधिकार संबंधित शासकीय उपक्रम/ महामंडळे/ मंडळे यांच्या संचालक मंडळास आणि सांविधिक संस्थेच्या प्रमुखास/अध्यक्षास राहतील.

\----